मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या सोमवार दिनांक २७ सप्टेंबर १९९३ रोजी संपन्न झालेल्या ११ व्या बैठकीचा स्थायी करण्यात आलेला कार्यवृत्त.

F-92.9



2.80

दिनांक : २७.९.१९९३

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

सोमवार दिनांक २० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ११ बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ११ वी बैठक सोमवार दि. २० सप्टेंबर ९३ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील मिटींग सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | डॉ. शंकर रा. नटकर | सभापती. |
| २] | श्री. हेमराज शहा | उपसभापती. |
| ३] | श्री. अजीत शाह | मुख्य अधिकारी |
| ४] | श्री. पोतदार<br>मुख्य अभियंता, मुंबई महानगरपालिका<br>यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ५] | श्री. रॉनी फ्रास्टो | " |
| ६] | श्री. दिनेश मूर्ती | " |
| ७] | श्री. महंमद फारुख मन्सूरी | " |
| ८] | श्री. व्ही. पी. वरळकर | " |
| ९] | श्री. शंकरराव पिळणा | " |
| १०] | श्री. महेंद्र भंडारी | " |
| ११] | श्री. चेतन शहा | " |
| १२] | श्री. कमलाकर कार्ले | " |
| १३] | श्री. श्री. महंमद आजिम खान | " |
| १४] | श्री. श्रीकांत पाटील | " |
| १५] | श्री. ना. य. नाईक<br>उपकर करनिर्धारक व संकलक,<br>मुंबई महानगरपालिका. | निमंत्रित. |

श्री. यादवराव कांबळे, उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अनुपस्थितीविषयी दूरध्वनीद्वारे पूर्वकल्पना दिली होती.

मा. सभापती डॉ. शंकरराव नटकर यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. सभेच्या प्रारंभी मंडळाचे मुख्य अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे श्री. अजीत शाह यांचे सभापतींनी पुष्पगुच्छ देऊन मंडळाच्या सदस्यांच्या वतीने स्वागत केले. मा. सभापती, उपसभापती, सदस्य व अधिकारी यांचे स्वागत केल्यानंतर बैठकीच्या नियमित कामास सुरुवात झाली.

बाब क्रमांक : ११/१
+++++++++++++++

विषय :- दिनांक २६ ऑगष्ट १९९३ रोजी झालेल्या १० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.
x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

दिनांक २६ ऑगष्ट ९३ रोजी झालेल्या मंडळाच्या १० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत पृष्ठ क्र. १ ते ३५ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. मा. सदस्यांनी पुढीलप्रमाणे सूचना केल्या.

१] श्री. हेमराज शहा : पृष्ठ क्र. २ वर ५ जुनी कासे असा उल्लेख हवा ऐवजी ५ जुनी कामे असा उल्लेख होता अशी सुधारणा सुचविली. ही सूचना मान्य करण्यांत आली.

२] उपमुख्य अभियंता : [दक्षिण] यांनी पत्राव्दारे कळविले की पुढील दोन अंदाजपत्रकांना मंजुरी मिळाल्याचा उल्लेख कार्यवृत्तांत करण्यांत यावा. सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांच्या पृष्ठ क्र. १५ वरील परिशिष्ठ "अ" मध्ये पुढील २ कामे समाविष्ठ करण्यांत यावित असा निर्णय घेण्यांत आला.

| अ.क्र. | पृष्ठ क्र. | कामाचे नांव | विभाग |
|---|---|---|---|
| २० | १२५ | ३९८ अे-बी काळबादेवी रोड | सी/३-४ |
| २१ | १२९ | ४, दादीशेठ लेन | डी-८ |

त्याचप्रमाणे ठराव क्र. १०.७१ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यांत याव्यांत.

२८ इमारतीऐवजी ३० इमारती

परिच्छेद १ मध्ये

१९ इमारतीऐवजी २१ इमारती.

वरीलप्रमाणे दुरुस्त्या व सुधारणांसह १० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यांत आला.

बाब क्रमांक : ११/२
+++++++++++++++

विषय : अनुपालन अहवाल.
x-x-x-x-x-x-x

पृष्ठ क्र. ३७ ते ६५-व वर सादर केलेल्या अनुपालन अहवालावर चर्चा झाली. या चर्चेत पुढील सदस्यांनी भाग घेतला व सूचना केल्या

१] श्री. शंकरराव पिटला : पृष्ठ क्र. ५ वर उल्लेख केल्याप्रमाणे संक्रमण शिबिरातील गाळा सोडताना संबंधित भाडेकरुकडून थकबाकी वसूल करण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली यासंबंधी प्रश्न विचारला. श्री. जगताप मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, इमारत दुरुस्ती करताना संक्रमण शिबिरात गाळा दिलेल्या रहिवाशांवर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवता येत नाही. त्यामुळे या रहिवाशांकडून थकबाकी वसूल करणे शक्य होत नाही. सविस्तर चर्चेअंती असा प्रस्ताव सादर करण्यांत आला की संक्रमण शिबिरांत गाळा वितरित करताना सध्या रु. १०००/- अनामत रक्कम घेतली जाते, त्यांत वाढ करुन रु. २०००/- एवढी अनामत रक्कम घेण्यांत यावी व थकबाकी वसूल झाल्यानंतर ही रक्कम १५ दिवसांत रहिवाशास विनाविलंब परत मिळावी. सर्वानुमते हा प्रस्ताव मान्य करण्यांत आला व पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्रमांक : ११-८२

मंडळाच्या संक्रमण शिबिरांत गाळा वितरीत करताना प्रत्येक गाळ्यामागे रु. २०००/- एवढी अनामत रक्कम आकारण्यात यावी हा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

पृष्ठ क्र. ७ वर मुंबई महानगरपालिकेकडून अद्याप रु. ४८ कोटी एवढी दुरुस्ती उपकराच्या थकबाकीची वसूली व्हावयाची आहे या संदर्भात कोणती कार्यवाही केली यासंबंधीची माहिती श्री. शंकरराव पिटला यांनी विचारली. मुंबई महानगरपालिकेचे उपकरनिर्धारक व संकलक श्री. नाईक यांनी वसुलीच्या संदर्भात करण्यांत आलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. १ एप्रिल ९३ ते ३१ ऑगस्ट ९३ पर्यंत रु. ५.३१ कोटी वसूली करण्यांत आली आहे. ऑगस्ट ९३ महिन्याचे उद्दिष्ट २.५० कोटी ठरविले असून त्यापैकी रु. १.९५ कोटी एवढी वसुली झाल्याची त्यांनी माहिती दिली.. या संदर्भात सविस्तर तपशिल पुढील बैठकीत सादर करण्याचे त्यांनी मान्य केले.

पृष्ठ क्र. ३९ वर पुनर्रचित इमारतीमधील रिक्त गाळ्याची सादर केलेली माहिती अपुरी असल्याची तक्रार श्री. शंकरराव पिटला व अन्य सदस्यांनी केली.

श्री. विवेक भर्तू यांनी प्रश्न विचारला की पृष्ठ क्र. ७ वर उल्लेख केल्याप्रमाणे अनिवासी गाळ्यांची तूट भरुन काढण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली. मुख्य अधिकारी [illegible] यांनी खुलासा केला की अद्याप वितरीत न केलेल्या अनिवासी गाळ्यांचे [illegible]

[illegible signature]

माहिती ... काम सुरु आहे.

पृष्ठ क्र. ११ वर उल्लेख केल्याप्रमाणे हेरीटेज वास्तूतील इमारतींच्या पुनर्विकासा संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याच्या संदर्भात शासनास स्मरणपत्र पाठविण्याची सूचना विवेक भर्तू यांनी केली. ही सूचना मान्य करण्यात आली.

श्री. विवेक भर्तू यांनी निदर्शनास आणून दिले की जुनी इमारत पाडून त्याजागी नवीन इमारत पुनर्विकसीत केल्यानंतर सुध्दा जुन्या इमारतीचा दुरुस्ती उपकर रद्द करण्यात येत नाही. या संदर्भात संबंधित अधिकारी श्री: नाईक यांनी खुलासा केला की, प्रचलित धोरणानुसार दुरुस्ती उपकर रद्द करण्याविषयी शासनाकडून प्रस्ताव आल्यानंतरच मुंबई महानगरपालिकेस दुरुस्ती उपकर रद्द करण्याची कार्यवाही करता येते. या विषयावर सविस्तर चर्चा झाली व शासन निर्णयानुसार इमारतीच्या पुनर्विकास झाल्यास त्या इमारतीचा दुरुस्ती उपकर रद्द होणे आवश्यक आहे. असे मत सर्व सदस्यांनी व्यक्त केले. या विषयावर निर्णय घेण्यासाठी शासन, मुंबई महानगरपालिका व म्हाडाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करावी असे ठरले. पृष्ठ क्र. ५८ वरील सादर केलेल्या तक्त्यामध्ये ऑगस्ट १९९३ या महिन्याचे गाळे वितरण अशी दुरुस्ती करण्यात आली.

पृष्ठ क्र. ६१ वर सादर केलेल्या माहितीनुसार भाडेवसुली योग्य प्रकारे होत नाही, अशी तक्रार सदस्यांनी केली. या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रत्येक भाडेवसुलीकारास दरमहा भाडेवसुलीचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे व त्याप्रमाणे किंबहुना त्यापेक्षा अधिक भाडेवसुली झालेली आहे.

पृष्ठ क्र. ६३-अ वरील अहवालांत अनु. ३ वर श्रीकांत पाटील ऐवजी फारुख मन्सुरी अशी दुरुस्ती करण्यात आली.

बाब क्रमांक १०-३ च्या संदर्भात दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा तपशिल पृष्ठ क्र. ३०९ वर सादर करण्यात आला आहे. यापैकी ... नारायण निवास, कॅव्हेल क्रॉस रोड नं. ३ या इमारतीच्या संदर्भात माहिती देण्यात आली की न्यायालयाच्या निर्णयानुसार या इमारतीतील पहिल्या मजल्यावरील धर्मशाळेच्या जागेस दुरुस्ती उपकर आकारू नये असा निर्णय झाल्यामुळे या भागाची दुरुस्ती मंडळास करता येणार नाही अशी माहिती उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी सादर केली. इमारतीचे वरचे मजले अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्यामुळे पहिल्या मजल्याची दुरुस्ती करणे अनिवार्य आहे अशीही माहिती त्यांनी दिली. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की या इमारतीची दुरुस्ती मंडळाने ...

व ट्रस्टच्या मालकीच्या जागेच्या दुरुस्तीचा खर्च ट्रस्ट कडून वसूल करण्यात यावा. तसेच आमदार निधीमधून या कामासाठी निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे सर्वानुमते ठरले. सविस्तर चर्चेअंती परिशिष्ठ "क" मधील ३ इमारतींच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

ठराव क्रमांक : ११-८३

१० व्या बैठकीच्या कार्यवृत्तात पृष्ठ अ १५ वरील परिशिष्ठ "क" मध्ये दर्शविलेला, ३ इमारतींच्या दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

| अनु.क्र. | पृष्ठ क्र. | कामाचे नाव | विभाग |
| --- | --- | --- | --- |
| १. | १७९ | ६-१०, भाई जिवनजी लेन | सी/३-४ |
| २. | १९९ | ३०-३४, बुनाम विलन रोड | ब |
| ३. | ११३ | ४५-४५ बी, नारायण निवास | सी/३-४ |

बाब क्रमांक : ११/३

विषय:- उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीचा कार्यक्रम.

x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

दुरुस्ती व पुनर्बांधणी कार्यक्रमाविषयी आर्थिक आढावा घेणारी टिप्पणी पृष्ठ क्र. ६५ वर सादर केली आहे. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. मुख्य अधिकारी यांनी दुरुस्ती व पुनर्बांधणी कार्यक्रमाचा आर्थिक आढावा घेतला. १९९३-९४ च्या अंदाजपत्रकात या कार्यक्रमासाठी रु. ५५.३३ कोटी खर्चाची तरतूद केली आहे. परंतु भाडेवली व महसूली जमा रु. ५४.४८ कोटी अपेक्षित आहे. त्यापैकी पुनर्रचित गाळ्यांतील अनधिकृत गाळेधारकांकडून जमा होणाऱ्या दंडापैकी रु. १०.०० कोटी मंडळास यावर्षी उपलब्ध होण्याची शक्यता नाही. त्यामुळे मंडळास सुमारे रु. ११.०० कोटींची तूट सोसावी लागणार आहे. दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेत ५०% वाढ झाल्याने दुरुस्ती खर्चातही त्याच प्रमाणात वाढ झाली आहे. बॉम्बस्फोट व दंगलीत मोडतोड झालेल्या इमारतींची दुरुस्ती करण्यासाठी नियमित निधीतून मोठा खर्च करावा लागला आहे. त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या निधीमधून दुरुस्ती व पुनर्बांधणी कार्यक्रम राबविताना आर्थिक तूट येणार नाही यासाठी आतापासूनच उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. यासाठी मंडळातर्फे पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

अ] ज्या इमारतींची दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत, त्या इमारती फक्त संरचनात्मक दृष्टया सुरक्षित करण्याएवढा दुरुस्ती खर्च मर्यादित ठेवण्यांत येईल.

ब] तातडीने करावयाच्या व अत्यावश्यक स्वरूपाच्या दुरूस्त्या वगळता दुरुस्तीची अन्य कामे तात्पुरता स्थगित ठेवण्यांत येतील.

क] इमारतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक भागास टेकू लावण्यांत येतील.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली. सर्व सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला. उद्‌भवलेल्या आर्थिक पेचप्रसंगामुळे दुरुस्तीची अनेक कामे अर्धवट अवस्थेत आहेत तर अनेक कामे हाती घेता येत नाहीत. त्यामुळे मंडळाच्या सदस्यांना जनतेच्या असंतोषास तोंड द्यावे लागत आहे. सविस्तर चर्चेअंती सदस्यांनी पुढीलप्रमाणे सूचना केल्या.

१] सध्या प्रगतीपथावर असलेली दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत.

२] सभापतींच्या नेतृत्वाखाली मंडळाच्या शिष्टमंडळाने मा. गृहनिर्माण मंत्री व मा. मुख्यमंत्री यांची भेट घेऊन त्यांना उद्‌भवलेल्या आर्थिक परिस्थितीची कल्पना देऊन दुरुस्ती व पुनर्बांधणी कार्यक्रमासाठी निधीमध्ये वाढ करण्याची तसेच बॉम्बस्फोट व दंगलग्रस्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करावी.

३] सध्या दुरुस्तीचे कोणतेही नवीन अंदाजपत्रक मंजूर करू नये.

४] पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्याच्या दृष्टीने तातडीने निर्णय घेण्याची शासनास विनंती करावी.

५] हा निधी तातडीने उपलब्ध व्हावा यासाठी अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्याच्या प्रक्रियेस आतापासूनच प्राथमिक पूर्वतयारी सुरू करावी.

६] पुढील बैठकीत आर्थिक परिस्थितीचा सविस्तर अहवाल सादर करणे.

यात पुढील बाबींचा समावेश असावा.

अ] १९९२-९३ या वर्षात सुरु झालेली काम पूर्ण करण्यास आवश्यक असलेला निधी.

ब] अंतिम देयके अदा करण्यासाठी आवश्यक असलेला निधी.

क] १९९३-९४ या वर्षात मंजूर केलेली अंदाजपत्रके व त्या कामासाठी झालेला खर्च.

ड] बॉम्बस्फोट व दंगलग्रस्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च व अपेक्षित खर्च.

सविस्तर चर्चेअंती ही सूचना मान्य करण्यात आली.

वरील निर्णयाच्या अनुषंगाने बाब क्र. ११.३.अ व बाब क्र. ११.३.ब अन्वये सादर केलेले दुरुस्तीचे सर्व प्रस्ताव तात्पुरते प्रलंबित ठेवण्यात आहे.

बाब क्रमांक : ११/३-क

विषय :- दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भाग पाडण्याच्या व टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्याविषयी.....

x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

या विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. २०५ फ वर सादर केली आहे. उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी या संबंधीचा सविस्तर खुलासा केला. प्रचलित धोरणानुसार नोव्हेंबर ते ऑक्टोबर या एक वर्षाच्या कालावधीसाठी या कामासाठी दरपत्रके मागविले जाते. ९३-९४ या आर्थिक वर्षासाठी या कामासाठी रु. ८५.०० लक्ष ची तरतूद अंदाजपत्रकात केली आहे. त्यापैकी ३१.८.९३ पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च रु. ३४.७९ लक्ष आहे. १.९.९३ ते ३१.३.९४ या कालावधीसाठी रु. ५०.२१ लक्ष खर्च करण्यास मंजुरी तसेच इमारतीस टेकू लावण्याच्या कामासाठी १.११.१९९३ ते ३१.१०.९४ या वर्षाच्या रु. २५.७४ लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची त्यांनी सभागृहात विनंती केली.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली. इमारतींना टेकू लावण्यासंबंधी विभागवार रजिस्टर ठेवण्यात यावे. अशी सूचना यापूर्वी दिलेली होती. या संदर्भात कोणती प्रगती झाली या संबंधीची माहिती सदस्यांनी विचारली. उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी माहिती दिली की विभागवार रजिस्टर ठेवले असून त्यात झालेल्या कामाची नोंद ठेवण्यात आली आहे. पुढील बैठकीत या कार्यवाहीसंबंधीची सविस्तर टिप्पणी सादर करण्याची सूचना दिल्यानंतर सदर प्रस्तावास देण्यात आली.

ठराव क्रमांक : ११-८४
+++++++++++++++++++

दक्षिण परिमंडळ क्षेत्रातील उपकरपात्र इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्यासाठी १.११.९३ ते ३१.१०.९४ या कालावधीसाठी रु. २५.०४ लक्ष अंदाजित रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. तसेच १.९.९३ ते ३१.३.९४ या कालावधीसाठी धोकादायक भाग पाडण्याच्या व टेकू लावण्याच्या कामास रु.५०.२१ लक्ष खर्च करण्यास अनुमती देण्यात आली.

बाब क्रमांक : ११/४/१
+++++++++++++++++++

विषय :- १७-१९-२१-२३-२५-२७ दुसरा कोळीवाडा, माझगांव या इमारतींच्या पुनर्बांधणीच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी.

x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

या प्रस्तावासंबंधी सविस्तर टिप्पणी पृष्ठ क्र. २०७ ते २२१ वर सादर केली आहे. कार्यकारी अभियंता पु. वि. २ यांनी या पुनर्बांधणी योजनेची माहिती सभागृहास दिली व भूसंपादनाचा प्रस्ताव कार्यान्वित करण्यासाठी या योजनेच्या रु.४१,७९,९०३/- या अंदाजित खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याची विनंती केली. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. ही योजना तुटीची असून १६ निवासी गाळे कमी होणार आहेत. ही तूट भरुन काढण्यासाठी मंडळास वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देण्याविषयीची विनंती मुंबई महानगरपालिकेस करावी अशी सूचना सदस्यांनी केली. अशाप्रकारची विनंती मुंबई महानगरपालिकेस करण्याचे ठरले व या पुनर्बांधणी योजनेच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय झाला.

ठराव क्रमांक :११/८५
================

इमारत क्र.१७-१९-२१-२३-२५-२७ दुसरा कोळीवाडा, माझगांव"ई" विभाग या इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रु.४१,७९,९०३/- एवढा अंदाजित खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : ११/४/२

विषय:- इमारत क्र.१४५ डी, १४५ ई, १४५ एफ १४७-१५१-१५५ जी साने गुरूजी मार्ग व ४३९, ४३९ ए-बी, ४३९ सी, ४३९ डी. ना.म.जोशी मार्ग या इमारतींच्या पुनर्बांधणीच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळण्याविषयी.

x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

या विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. २२५ ते २३९ वर सादर केली आहे. कार्यकारी अभियंता पु. वि. २ यांनी या विषयाची माहिती सभागृहास दिली. या पुनर्बांधणी योजनेच्या रू. ६४.०० लक्ष एवढ्या खर्चास मंडळाने एप्रिल ८० मध्ये प्रशासकीय मंजुरी दिली होती. या योजनेची भू-संपादन प्रक्रिया प्रगतीपथावर असताना घर मालकांनी न्यायालयात भू-संपादन प्रक्रियेस आव्हान दिले. न्यायालयाने पूर्वीच्या भू-संपादन प्रक्रिया रद्दबातल ठरविल्यामुळे या योजनेची भू-संपादन प्रक्रिया नव्याने सुरू करावी लागत आहे. त्यानुसार या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रू. २,९३,००,७००/- एवढ्या अंदाजित खर्चास सुधारित प्रशासकीय मंजुरी द्यावी, अशी विनंती सभागृहास केली. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठराव क्र. ११/८६

इमारत क्र. १४५-डी, १४५-ई, १४५-एफ, १४५-एफ , १४७-१५१ १४५ जी साने गुरूजी मार्ग व ४३९, ४३९ ए बी, ४३९-सी, ४३९-डी ना.म.जोशी मार्ग व १५३-१५५ साने गुरूजी मार्ग "ई" विभाग या इमारतीच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेसाठी रू. २,९३,००,७००/- एवढ्या अंदाजित खर्चास [ भूसंपादनासहित ] प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : ११/४/३

विषय:- इमारत क्र. ९४-१०४-१०६ तात्या घारपुरे पथ व इमारत क्र. ६ ओदळवाडी "डी" विभाग पुनर्बांधणी योजना.

x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

या विषयाचा बाब टिप्पणी पृष्ठ क्र. २४१ ते २६५ वर सादर केली आहे. उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी या प्रस्तावाची सविस्तर माहिती सभागृहास दिली. मंडळाच्या ७ व्या बैठकीत या योजनेस

प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली होती. या प्रस्तावांत १०८,तात्या घारपुरे मार्ग या इमारतीचा समावेश केलेला आहे. उपलब्ध माहितीनुसार या इमारतीचा क्रमांक ६ ओवळवाडी असा आहे. शिवाय रहिवाश्यांची संख्या ११ ऐवजी २० झालेली आहे. त्यामुळे या सुधारणेसह या पुनर्बांधणी योजनेच्या रु. ५५,८३,०८४/- खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याची तसेच भू-संपादन प्रक्रिया सुरु करण्यासाठी १०६ तात्या घारपुरे पथ या इमारतीस म्हाडा अधिनियम उपकर क्र. ८८ [३] [ब] अन्वये घोषित करण्याची विनंती करण्यात आली. सविस्तर चर्चेअंती वरील प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यांत आले.

ठराव क्रमांक: ११/८७
÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷

इमारत क्र.-९४-९८-१०४-१०६,तात्या घारपुरे पथ व ६ ओवळवाडी या इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या प्रस्तावाच्या रु. ५५,८३,०८४/- एवढ्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

ठराव क्रमांक : ११/८८
÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷

इमारत क्र. ९४-९८-१०४-१०६,तात्या घारपुरे पथ व इमारत क्र. ६ ओवळवाडी ही संयुक्त पुनर्बांधणी योजना कार्यान्वित करण्यासाठी १०६ तात्या घारपुरे पथ या इमारतीच्या जमिनीचे संपादन करणे आवश्यक असल्यामुळे म्हाडा अधिनियम ८८ [३] [ब] अन्वये १०६,तात्या घारपुरे पथ या इमारतीचे संपादन करण्याचे प्रमाणपत्र देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

ठराव क्र. ११/७/४
÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷

विषय:- इमारत क्र. १अ, १-ब ड, १-क, १-ई ,१-जी एच, १-एस, १-आर, ३-अ ब, ५-७,गनपावडर रोड या इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी मिळण्याविषयी.
x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

या प्रस्तावाची सविस्तर टिप्पणी पृष्ठ क्र. २६७ ते २९१ वर सादर केलेली आहे. कार्यकारी अभियंता,पु. वि. २ यांनी या प्रस्तावाची सविस्तर माहिती देऊन या योजनेच्या रु. १,६०,५३,५३१/- एवढया खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याची विनंती केली. सविस्तर चर्चेअंती या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

२५० 246

Tenants/Occu... 9, Room no. 2, ... EE/D-1/2370

ठराव
÷÷÷÷÷

इमारत क्र. १-अ, १-ब ड, १-क, १-ई, १-जी एच, १-एस, १-आर, ३ अ-ब, ५-७ गनपावडर रोड माझगांव, ई" विभाग या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रु. १,६०,५३,५३१/- एवढ्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक : ११/७
÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷

विषय:- जानेवारी ९३ मध्ये मुंबई शहरांत झालेल्या दंगलीत हानी झालेल्या उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीसाठी प्रमाणित मर्यादेपेक्षा अधिक होणारा खर्च.

x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x

वरील विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. २९९ ते ३०७ वर सादर केली आहे. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. सदस्यांनी तक्रार केली की शासन निर्णयासोबत जोडलेल्या यादीत काही दंगलग्रस्त इमारतींचा समावेश झालेला नाही. त्याचप्रमाणे या कामासाठी शासनाने स्वतंत्र निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. मा. गृहनिर्माण मंत्री यांचेकडे होणाऱ्या बैठकीत या विषयावर चर्चा करुन हा विषय पुढील बैठकीत चर्चेला ठेवावा, असे ठरले.

विषय सूचीवरील अन्य विषय प्रलंबीत ठेवून पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवावेत असे ठरले.

मंडळाच्या प्रतिक्षानगर सायन या संक्रमण शिबिरांत म्हाडा अभियंता व कर्मचारी संघटनेतर्फे आयोजित केलेल्या गणेशोत्सवात सादर केलेल्या अंतराळ व विज्ञान प्रदर्शनास "लोकसत्ता गिरनार" तर्फे पारितोषिक जाहीर झाले आहे. याबद्दल सभापतींना अभियंता व कर्मचारी संघटनेचे अभिनंदन केले.

मंडळाची १२ वी बैठक शनिवार दि. १६ ऑक्टो. ९३ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करावी, असे एकमताने ठरले.

मा. सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी व निमंत्रित यांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपन्न झाल्याचे जाहीर करण्यांत आले.

सही/-
सचिव/मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई
सही/-
मु. अ./मु. इ. दु. व पु. मं. मुंबई
सही/-
सभापती/मुं. इ. दु. व पु. मं. मुंबई

शिशना. ७१०९३

२१७

## परिशिष्ट क्रमांक ३

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दिनांक २६. ८. ९३ रोजी झालेल्या बैठकीत अंतर्भूत केलेल्या परंतु कार्यवृत्तांतील परिशिष्ट क्र. १ मध्ये समाविष्ट करावयाच्या राहिलेल्या प्रस्तावांची यादी.

| क्र. | पृ. क्र. | इमारतीचे नाव | विभाग. |
|---|---|---|---|
| १. | १२५ | ३१८, अे. बी. काळबादेवी रोड | सी–३/४ |
| २. | १२९ | ४ दादीशेठ अग्यारी लेन | डी–१ |

एकूण २

## परिशिष्ट क्रमांक : ८

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दिनांक २७. ९. १९९३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुपालन अहवालातील मुख्य अभियंता/प्राधिकरण यांचे छाननीनंतर प्रशासकीय मंजुरी दिलेल्या प्रस्तावांची यादी.

| अ. क्र. | | इमारतीचे नाव | विभाग. |
|---|---|---|---|
| १. | १७९ | ६–१० भाई जीवनजी लेन | सी ३/४ |
| २. | १९९ | ३०–३४ चुनाम किन लेन | ब |
| ३. | ११३ | ४५–४५ बी नारायण निवास, कॅव्हेल क्रॉस क्रॉस लेन नं. ३/ ३७–४१ दादीशेठ अग्यारी लेन. | सी ३/४ |

सचिव
मुंबई इमारत दु. व पु. मंडळ.

सभापती
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.